SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES- 5 (TERM-1)
Subject: Marathi

Grade - 3

Prepared by: Anju korde

पाठ क्र.५ चार मित्र

**पूर्व उपक्रम – तुमच्या मित्राविषयी माहिती लिहा.**

**शब्दार्थ**

१) जंगल – वन　　२) मुक्त केले – सोडविले

३) संथ – हळूहळू　　४) तीक्ष्ण – टोकदार

**प्रश्न.१ पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जंगलामध्ये कोण चार मित्र राहत होते ?

उत्तर - जंगलामध्ये एक कावळा, एक उंदीर, एक हरिण व एक कासव असे चार मित्र राहत होते.

२) कावळा उडत कोणाला शोधायला निघाला ?

उत्तर - कावळा उडत हरिणाला शोधायला निघाला.

३ ) उंदराने जाळे कसे तोडले ?

उत्तर - आपल्या तीक्ष्ण दातांनी कुरतडून उंदराने जाळे तोडले.

**प्रश्न.२ पुढील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा**.

१) शिकाऱ्याच्या जाळ्यात कोण अडकले ?

उत्तर - शिकाऱ्याच्या जाळ्यात हरिण अडकले.

२) कासव कसे चालत होते ?

उत्तर - कासव संथ गतीने चालत होते.

३) हरिण कुठे पळून गेले ?

उत्तर - हरिण जंगलात पळून गेले.

**प्रश्न.३ रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

१) कावळा उडत उडत <u>हरणाला</u> शोधायला निघाला. (उंदराला/हरणाला )

२) उंदीर व <u>कासव</u> जवळच असलेल्या दाट झाडीत लपून बसले. (हरिण /कासव)

३) <u>कावळा</u> उडून झाडावर जाऊन बसला. (उंदीर /कावळा)

**प्रश्न.४ कोण ते लिहा.**

१) तुरुतुरु चालणारा – उंदीर

२) संथ गतीने चालणारे – कासव

३) जाळ्यात अडकणारे – हरिण

**प्रश्न.५ पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१) मित्र × शत्रू　　२) रडणे × हसणे　　३) जवळ × दूर

४) चांगले × वाईट　　५) खरे × खोटे

**उपक्रम – जंगली प्राण्यांची चित्रे वहीत चिटकवून त्याखाली नावे लिहा.**

Teacher　　HOD　　Coordinator　　Principal